## प्रकरण १
## साधनांचे स्वरुप

प्रास्ताविक

ब्रिटीश अधिकाऱ्यांनी, विशेषतः ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रमुख सेवकांनी, त्यांच्या स्वतःच्या माहितीसाठी मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली, हा इतिहास लिहिण्यामध्ये त्यांचा राजकीय आणि व्यवस्थापनात्मक असा दुहेरी हेतू होता. त्यासाठी त्यांना मुघल इतिहासाची साधनांची माहिती करून घ्यावी लागली. ग्लॅडविन याने प्रथम आईन-ए-अकबरीचे भाषांतर आणि अभ्यास करण्यास सुरुवात केली. अशाच प्रकारे पेशव्यांकडून जिंकून घेतलेल्या प्रदेशाबद्दल एल्फिन्स्टनने त्याचा वृत्तांत लिहिला. मुघल, मराठे, राजपूत, हैदर आणि टिपू या आतापर्यंतच्या भारताच्या राज्यकर्त्यांची शासनपद्धती जाणून घेण्यासाठी नागरी आणि लष्करी सेवेतील ब्रिटीश अधिकाऱ्यांनी या राज्यकर्त्यांचा इतिहास लिहिला. कर्नल टॉडने राजपुतांवर कॅप्टन जेम्स ग्रँट डफने मराठ्यांवर, विल्क्सने म्हैसुरबद्दल लिहिलेले आढळते. साहजिकच या राज्यकर्त्यांचा इतिहास लिहिण्यासाठी साधने गोळा करून त्यांची छाननी करावी लागली आणि त्यांचा योग्य अभ्यास करावा लागला. पूर्वीच्या सत्तेपेक्षा ब्रिटीशांची सत्ता अधिक सरस आहे हे सिद्ध करणे हा भारताचा इतिहास लिहिण्यामागे दुसरा हेतू होता.

फारसी आणि इतर भाषांमधील अस्सल (मूळ) साधनांचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले जाऊ लागले. इलियट, डॉसन, वूलस्ले हेग, जॉन ब्रिग्ज, बी विलिस राईस आणि ब्लॉकमन यासारख्या गाढ्या अभ्यासकांनी अस्सल साधनांचे एका मागून एक खंड प्रकाशात आणले. पाश्चिमात्य अभ्यासकांनी सुरू केलेल्या कामात लवकरच भारतीय अभ्यासकांनी महत्त्वपूर्ण पुरवणी जोडली. यामध्ये राजस्थान मधील श्यामलदास, पंजाबमध्ये सीताराम कोहली, महाराष्ट्रामध्ये वि. का. राजवाडे, दक्षिण भारतातील एस्. के. अय्यंगार, के. ए. नीलकंठ शास्त्री आणि एन्. वेंकटरमणय्या या अभ्यासकांचा समावेश होता.

**दिल्ली सुलतानशाही आणि मुघलकालीन फारसी साधने**

दिल्ली सुलतानशाहीच्या काळाबद्दल असलेली साधने तुलनात्मक दृष्टीने संख्येने कमी आहेत, तर मुघल काळासाठी अनेक प्रकारची साधने मोठ्या संख्येने मिळतात. तरीसुद्धा आधुनिक काळातील साधनांच्या तुलनेने मुघल काळातील साधनेही अपुरी वाटतात. दिल्ली सल्तनतबद्दल दप्तरातील नोंदी मिळत नसल्याने आपल्याला प्रामुख्याने बरनीच्या तारीख-ए-फिरूझशाही, मिन्हज-उस- सिराजच्या तबकात-ए-नासिरी, शम्स-ए-सिराजच्या तारीख-ए-फिरूझशाही, हसन निझामीच्या तुज-उल्-मासीर इत्यादी साधनांवर अमीर खुश्रूच्या मसनवी आणि कासीदा, त्याच्या नू-सिपीहार, किरान-उस-सदेन या अर्ध ऐतिहासिक रचना, काही दख्खनी बखरकारांनी लिहिलेल्या बखरी उदा० फेरिस्ताच्या गुलशन- ए-इब्राहिम्, इसामीच्या फुतुह-उस-सलातीन यावर आणि परदेशी प्रवाशांच्या वृत्तांतावर, अवलंबून राहावे लागते. उदा० इब्न बतूताचे रेहला,

मुघलांच्या काळातील राज्याचे स्वरूप शासन व्यवस्था तसेच सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या अभ्यासासाठी अनेक प्रकारची साधने उपलब्ध आहेत. उदा० राज्यांच्या आठवणी (बाबरनामा, जहांगीरनामा इत्यादि), प्रशासकीय कारभाराविषयक पुस्तिका, राज्यातील कागदपत्रे, अधिकृत इतिहासलेखने (अकबरनामा, तुझकिरत-उल-वकीयत. मासीर-ए-आलमगीरी, तबकात-ए-अकबरी इत्यादि) यांचा या साधनांमध्ये समावेश होतो. अकबराच्या काळासाठी पेन-ए-अकबरी हे महत्त्वपूर्ण साधनांपैकी एक साधन आहे. त्यामुळे शासकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर प्रकाश पडतो.

**समकालीन कागदपत्रे**

फारशी आणि राजस्थानी कागदपत्रामध्ये आणि त्याचप्रमाणे शहर लेखा बही (म्हणजे वही), ब्याज बही आणि कंथन बही या बिकानेर दप्तरखान्यातील कागदपत्रामध्ये शासकीय व आर्थिक इतिहासासाठी महत्त्वपूर्ण माहिती मिळते. या तीन नोंदीमध्ये रोजगार, व्याजाचे दर, खाजगी कर्ज आणि राजस्थान राज्याचे व्याजाचे हिशोब यासारख्या गोष्टींबद्दलचे

तपशील मिळतात. कोटा भंडारचा बस्ता मध्ययुगीन काळातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहे. बिकानेर, जयपूर आणि जोधपूर येथील ब्यावा बहीमध्ये विवाह समारंभ, देणगीदाखल देण्याच्या वस्तू, त्यांच्या किंमती आणि तत्सम गोष्टीबद्दलची माहिती आहे.

महाराष्ट्रामध्ये संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना साधने उपलब्ध करून देण्यासाठी बरेच प्रयत्न करण्यात आले आहेत. वि. का. राजवाड्यांपासून ते ग. ह. खरे यांच्या पर्यंत अनेक अभ्यासक या कामामध्ये मग्न होते आणि आहेत. त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून आपल्याला मराठीमध्ये साधनांचे अनेक खंड मिळू शकतात. ऐतिहासिक लेख संग्रहाचे (७२७२ पत्रे असलेले १५ खंड) संपादन व्ही. व्ही. खरे यांनी केले आहे. वि. का. राजवाडे यांनी संपादित केलेली मराठ्यांच्या इतिहासाची साधने (५८०९ पत्रे असलेले २२ आणि ३ इतर खंड), गो. स. सरदेसाई यांनी संपादित केलेली सिलेक्शन फ्रॉम द पेशवा दफ्तर (८५६२ पत्रे असलेले ४५ खंड) आणि ग.ह. खरे यांनी संपादित केलेली बरीच फारसी, मराठी, कानडी व इतर कागदपत्रे आहेत. सिलेक्शन्स फ्रॉम द पेशवा दफ्तरी, न्यू सीरीज (४८८ पत्रे असलेले २ खंड), पारसनीस, वाड, मावजी यांनी संपादित केलेले सिलेक्शन्स फ्रॉम द सातारा राजाज अँड पेशवाज डायरीज (३४९२ पत्रे असलेले ९ खंड) फाळके, डिस्कळकर, सरदेसाई आणि दिघे यांनी संपादन केलेले शिंदेशाहीच्या इतिहासाची साधने (२६६५ पत्रे असलेले ७ खंड), पी. एम्. जोशी यांनी संपादन केलेली पूना अखबार्स (२२३ पत्रे असलेले ३ खंड), गुजर यांच्या करवीरच्या इतिहासाची साधने (१३५० पत्रे असलेले ७ खंड), होळकरांबद्दलची साधने, उदा० होळकरशाहीच्या इतिहासाची साधने (१००६ पत्रे असलेले ३ खंड), सिलेक्शन्स फ्रॉम दि बडोदा दफ्तर (१३९९ पत्रे असलेले ९ खंड), ८१२५ पत्रे असलेले १२४ खंडांचे भा. इ. सं. मंडळ प्रकाशन, शेजवलकरांनी संपादित केलेले डेक्कन कॉलेज प्रकाशन (७३९ पत्रे असलेले २ खंड) आणि इतर अनेक कागदपत्रे आहेत. नुकतेच ए. जी. पवार यांनी ताराबाई आणि तिच्या काळावरील 'ताराबाईकालीन कागदपत्रे' आणि जीजाबाईकालीन कागदपत्रे,' यांचे काही खंड प्रकाशात आणले आहेत. प्रकाशित झालेल्या साधनांव्यतिरिक्त आपल्याकडे महाराष्ट्रामध्ये अप्रकाशित स्वरूपाची साधने फार मोठ्या प्रमाणावर आहेत. पुणे येथील दप्तरखान्यात पेशवेकाळाशी संबंधित कागदपत्रांचा सर्वात मोठा संग्रह आहे. त्यामध्ये सुमारे ४ कोटी कागदपत्रांचे ३९००० गठ्ठे आहेत. हे गठ्ठे रुमाल म्हणून ओळखले जातात, मुंबई येथील दप्तरखान्यात महाराष्ट्र राज्यामधील सर्वात मोठा इंग्रजी कागदपत्रांचा संग्रह आहे. ही कागदपत्रे निरनिराळ्या खंडामध्ये बांधून व फाईलींमध्ये एकत्रित ठेवलेली आहेत. अशा खंडांची व फाईलींची संख्या सुमारे ५ लाखावर आहे. ही कागदपत्रे निरनिराळ्या शासकीय, समाजिक आणि आर्थिक बाबींशी, उदा० प्रशासन, शिक्षण, कायद्याच्या बाबी, ग्रामीण अर्थशास्त्र, सार्वजनिक आरोग्य, बंदरे, दळणवळणाची साधने, व्यापार, उद्योगधंदे आणि पाणीपुरवठा इत्यादी गोष्टींशी संबंधित आहेत.

महाराष्ट्रातील खाजगी दप्तरखान्यामध्ये पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचे संग्रहालय हे सर्वात मोठे संग्रहालय आहे. त्यामध्ये लाखो ऐतिहासिक कागदपत्रे आहेत. ही कागदपत्रे राजकीय, प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि इतर बाबींशी संबंधित आहेत.

अलीकडच्या काळात पोर्तुगीज कागदपत्रांच्या अभ्यासाच्या दृष्टीने आणि ती कागदपत्रे अभ्यासकांना उपलब्ध व्हावेत याद्दृष्टीने कसून प्रयत्न करण्यात आले. या क्षेत्रातील सुरुवातीच्या संशोधकांपैकी पिसुर्लेकर हे एक होत. पश्चिम भारतातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या अभ्यासासाठी पोर्तुगीज कागदपत्रांचे महत्त्व त्यांनीच प्रथम इतिहासकारांच्या लक्षात आणून दिले. ही पोर्तुगीज साधने पणजी येथील गोवा दप्तरखान्यात उपलब्ध आहेत.

संशोधक अभ्यासू व्यक्तींना साधने उपलब्ध करून देण्यासाठी आय. सी. एच्. आर. ने चार प्रकारचे प्रकल्प हाती घेतले आहेत (१) साधनांचे संपादन, (२) साधनांचे भाषांतर, (३) भारतीय व विदेशी कागदपत्रांचा संग्रह करणे आणि (४) या संग्रहांची संपूर्ण यादी तयार करणे. संपादित झालेली अथवा संपादित केली जात असलेली साधने म्हणजे जोधपूर राज्यकी ख्यात, जलोर परगणारी विगत, ईश्वरदास नागर यांची फुतुहाते आलमगिरी, इत्यादि. मुघलांच्या काळातील भारतीय कागदपत्रांचा संग्रह करण्याचे काम चालू आहे. त्याचप्रमाणे इन्शा-ए-अब्दुल फझल आणि जयपूरच्या राजांना उद्देशून दिलेली मुघलांची फर्मान, निशान व मनशूर यांचे तारीखवार वर्ग करण्यात येऊन प्रकाशन करण्याचे काम चालू आहे. परदेशी साधनांच्या संदर्भात डच (१९१७- २१) नोंदीची तारीखवार वर्गवारी करण्यात आलेली

आहे. १७० व्या शतकातील भारताशी संबंधित असलेल्या रशियन कागदपत्रांचे संकलन चालू आहे. राजस्थान ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट, टोंक येथील हस्तलिखित प्रती, राजस्थानमधील ऐतिहासिक कृती आणि आंध्रप्रदेश स्टेट अर्काइव्हज मधील कागदपत्रे यांची संपूर्ण यादी बनवण्याचे काम चालू आहे. त्याशिवाय आतापर्यंत अजमेर-मेरवारा (मारवाड) येथील थिकानांच्या ऐतिहासिक नोंदींचा आढावा घेण्याचे, संपादन करण्याचे आणि मायक्रोफिल्मिंग करण्याचे काम चालू
आहे.

**शिलालेख व ताम्रपट**

शिलालेख व ताम्रपट यात मध्ययुगीन प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक इतिहासासाठी बरीच विश्वसनीय व समकालीन माहिती मिळते. राजस्थानच्या सामाजिक आणि आर्थिक इतिहासाची काही सुरुवातीची साधने म्हणजे १५व्या शतकातील कुंभलगड शिलालेखासारखे शिलालेख होत. त्यामध्ये गावे आणि किल्ले, आश्रमसंस्था, तुलदान, पाठशाळा, शिवरात्री आणि वसंतोत्सव, यासारखे उत्सव याबद्दल उल्लेख आढळतात. विजयनगर आणि त्याच्या शाखांच्या इतिहासासाठी शिलालेखांची उपयुक्तता जास्त आहे. विजयनगर काळातील राजकीय नोंदी चार प्रकारांमध्ये मोडतात : शासनम्, जयपत्रम्, आज्ञापत्रम् आणि प्रज्ञापनम्, साधारणतः जमीन दान देण्यासाठी शासनम् दिले जात असे. यांची नोंद दगडावर, भिंतीवर अथवा

ताम्रपटावर किंवा कागदावर केली जात असे. कायदेशीर बाबींमध्ये दिलेले निर्णय जयपत्रम्मध्ये दिले जात असत. सरकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या राजाज्ञा आज्ञापत्रम् मध्ये असत. प्रज्ञापनम्मध्ये राजाचे जाहीरनामे असत. या सर्वांमध्ये कमीअधिक प्रमाणात सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीबाबत माहिती मिळते. फक्त कर्नाटकासाठी २०००० वर शिलालेख गोळा केलेले आहेत. त्यापैकी १४००० शिलालेखांचे संपूर्ण प्रकाशन झालेले आहे, ६००० वर शिलालेखांचा सारांश प्रकाशित झालेला आहे आणि इतर १०००० वर शिलालेखांचे प्रकाशन अजून व्हावयाचे आहे. प्रथम शिलालेखांचा उपयोग निरनिराळ्या घराण्यांचा कालक्रम ठरविण्यासाठी आणि राजकीय इतिहास लिहिण्यासाठी केला जात असे. परंतु त्यामध्ये सामाजिक आणि आर्थिक इतिहासाबद्दलच्या माहितीचाही खजिनाच आहे. त्यामध्ये अनेक करांबद्दलचे संदर्भ, जमिनीवरील कर आकारणीबद्दलची माहिती, मापन साधनांबद्दल माहिती, निरनिराळ्या जमिनींबद्दलचे उल्लेख व माहिती, विविध जीवनावश्यक वस्तूंवरील करांविषयी माहिती, व्यवसायावरील कराबद्दल तपशील, मालाच्या जलवाहतुकीवरील कराबद्दल आणि प्राण्यांवरील कराबद्दल तपशील, जमीनदार आणि कुळे यांच्यातील उत्पादन संबंधांबद्दल माहिती, निरनिराळ्या व्यापारी संघांबद्दल माहिती, त्यांच्या संस्था, त्यांच्या व्यापारी हालचाली याबाबतचे तपशील, विविध जाती आणि जमाती, निरनिराळ्या धार्मिक रीती, उत्सव-समारंभ आणि तत्सम गोष्टींबद्दल माहिती या गोष्टी आढळतात.

मध्ययुगीन आंध्रासाठीसुद्धा शिलालेख हे प्रमुख साधन होय. हनुमकोंडा येथील हजार खांबांचा शिलालेख आणि गणपतीदेव याचा मोटुपल्ली शिलालेख इत्यादि काकतीय शिलालेखांवरून सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती तसेच सागरी व्यापार इत्यादि गोष्टींबद्दल माहिती मिळते. कोंडवीडूचे रेड्डी, तेलगू चोल, तेलगू पल्लव, वेलांदडू चोल यांचे शिलालेखसुद्धा या संदर्भामध्ये मौल्यवान स्वरूपाचे आहेत आणि त्याचप्रमाणे आंध्रमध्ये विजयनगरचे शिलालेखही अनेक आहेत. शिलालेख आणि ताम्रपट वगैरेंना एपिग्राफिया इंडिका, द इंडियन अॅन्टीक्केरी, आंध्र पत्रिका, आणि जर्नल ऑफ तेलगू अॅकॅडमी या नियत- कालिकांमधून प्रसिद्धी देण्यात आली. नुकतेच असे शिलालेख व ताम्रपट एका नवीनच सुरू झालेल्या एपिग्राफिया आन्ध्रिका या नियतकालिकांमधून प्रसिद्धी करण्यात येत आहेत. अनेक शिलालेख व ताम्रपटांचा समावेश मॅकेन्झी संग्रह आणि सी.पी. ब्राऊनच्या 'लोकल रेकॉर्डस्' मध्ये करण्यात आलेला आहे.

मल्याळम्मधील शिलालेखादि साधने त्रावणकोर आर्किऑलॉजिकल सीरीज, राम वर्मा रिसर्च इन्स्टिट्यूट बुलेटीन, केरळ सोसायटी पेपर्स, साऊथ इंडियन इन्सक्रिप्शन्स इंडियन अँटिक्केरी, एपिग्राफिया इंडिका, इंडियन हिस्टोरिकल कार्टरली, अॅन्युअल रिपोर्टस् ऑफ साऊथ इंडियन एपिग्राफी आणि तत्सम इतर संग्रहांमध्ये मिळतात. देवळामधील शिलालेख केरळमध्ये नेहमी आढळतात. केरळमधील शिलालेखांमध्ये पगार, किंमती, भाव, व्याजाचे दर,

नाणी, वजने आणि मापने यासंबंधीच्या आर्थिक बाबींवर प्रकाश पडतो. या शिलालेखांच्या आधाराने केरळमधील सरंजामशाहीचा उदय व विस्तार याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रा. एलामकुलम यांनी केलेला आहे.

कोचीन आणि मलबार येथील शिलालेख त्या भागातील सामाजिक इतिहासासाठी संपूर्णपणे वापरता आणले जाण्याची वाट पहात आहेत. (हिस्टोरिओग्राफी इन् इंडियन लँग्वेजेस पृ. १०८) या नोंदीवरून आपल्याला 'जमीन मालमत्ता आणि राजकीय सत्ता यावरील ब्राह्मणांचे वर्चस्व, समाजव्यवस्थेतील वाढती गुंतागुंत आणि ताठरपणा आणि सोन्याऐवजी नाण्यांचा वाढता उपयोग' याबाबतची माहिती मिळते.

**परदेशी प्रवाशांची प्रवास-वर्णने**

सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या शिलालेखातील माहितीला परदेशी प्रवाश्यांच्या वर्णनाचाही चांगला आधार मिळतो. इब्न बतुताने त्याच्या 'रेहला' मध्ये येथील लोकांचे रीतिरिवाज आणि आचरणपद्धती, रस्ते, जलमार्ग, जलवाहतुकीची साधने यासारखी दळणवळणाची साधने आणि नाणी इत्यादींचे मोठे मनोज्ञ व हुबेहूब वर्णन केलेले आहे. मुघलकाळात भारतात आलेल्या मन्रिके, पेल्सार्ट, मनूची बर्निअर, मेंडेलस्लो, टॅव्हेर्नियर, टेरी, थिवेनॉट, केरेरी, पीटर मुंडी व इतर अनेक परदेशी प्रवाशांची वर्णने, तत्कालीन प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकतात. विजापूर राज्याला भेट देणारे फिच् आणि न्यूबेरी, पहिल्या देवरायाच्या कारकीर्दीमध्ये विजयनगरला भेट देणारा निकोलो-डी-कोन्टी, दुसऱ्या देवरायाच्या काळामध्ये आलेला अब्दुल रझाक, कृष्णदेवरायाच्या काळामध्ये विजयनगरला आलेले डोमिंगो पेईस, फर्नाओ न्यूनिझ आणि बार्बोसा यांनी सामाजिक व आर्थिक परिस्थितीबद्दल तपशील दिलेले आढळतात. निकितिन, पियट्रो डेल्ला व्हॅल्ले आणि त्याचप्रमाणे इतरांनी यांचे अनुकरण केलेले दिसून येते. फ्रान्सिस बुकॅननने दिलेला वृत्तांत आणि मॅकेन्झी संग्रह ही सर्व अशा अभ्यासाची अतिशय मौलिक साधने आहेत.

नाणी : इतिहासाचे एक साधन

मध्ययुगीन भारतातील शासनव्यवस्था, सामाजिक आणि आर्थिक जीवन यांवर नाण्यांच्या अभ्यासामुळे बराच प्रकाश पडतो. या काळात प्रामुख्याने मुसलमानी राजांची नाणी आणि हिंदू राजांची नाणी असे नाण्यांचे दोन प्रकार पाडता येतील. मुसलमानी राजांच्या नाण्यावर साधारणतः पहिल्या चार धर्मभीरू खलीफांची नावे, तत्कालीन खलीफाचे नाव, भारतातील मुसलमानी राजाचे नाव, नाणी पाडलेले वर्ष तसेच त्यांची टांकसाळ असलेले शहर याबद्दल माहिती मिळत असल्याने राजाचे नाव, खलीफा आणि त्या राजामधील संबंध, त्याचा राज्यविस्तार वगैरे गोष्टीबद्दलचा इतिहास लिहिता येतो. अकबरच्या नाण्यावरील राम-सीतेचे चित्र, पक्ष्याचे चित्र, जहांगीरच्या नाण्यावरील निरनिराळ्या राशींची चित्रे आणि इतर चिन्हे यांवरून त्यांचे हिंदुंबद्दलचे धोरण स्पष्ट होते. औरंगजेबचा कर्मठपणा नाण्यावरून सिद्ध होतो. नाण्याच्या विपुलतेमुळे, विशेषतः सोन्याची नाणी म्हणजे मोहरा यांच्या विपुलतेमुळे, मुघलकालीन समृद्धीचे दर्शन घडते. इल्तत्मिशने प्रथम रुप्याची नाणी (टंका) पाडण्यास सुरुवात केली. राजपूत कारकीर्दीत गडप झालेली चांदी दिल्ली सुलतानशाही काळात पुन्हा बाहेर आल्यामुळे चांदीची नाणी पाडता आली. दक्षिण दिग्विजयानंतर तेथून बरेच सोने आणल्यामुळे अल्लाउद्दीन खलजीला मोठ्या प्रमाणावर सोन्याची नाणी पाडणे सहज शक्य झाले. इल्तत्मिशच्या १२२८च्या नंतरच्या नाण्यावरून तो प्रत्यक्षात स्वतंत्र राजा असून देखील घटनात्मकदृष्ट्या खलीफाच्या अधिपत्याखाली होता हे कळते.

१२२८ मध्ये मुस्तन्शीर या बगदादच्या खलीफाकडून अधिकार पत्र स्वीकारल्या नंतर त्याने खलीफाचे नाव असलेली अशी नाणी पाडण्यास सुरुवात केली. अलाउद्दीन खलजी इतका बलाढ्य असला तरी त्याच्या नाण्यावर तो स्वतःला 'खिलाफतीचा उजवा हाथ' म्हणवून घेतो. म्हणजे त्याने खलीफाचे सार्वभौमत्व मान्य केले होते. पण त्याचा वारस कुतुबुद्दीन मुबारक याने मात्र खलीफाचे आधिपत्य पूर्णपणे झुगारून दिले. हे त्याच्या नाण्यावरून आपल्याला कळते. कारण त्याच्या नाण्यावर त्याने स्वतःला 'इस्लामचा सर्वश्रेष्ठ प्रमुख,' 'स्वर्ग आणि पृथ्वीचा प्रभु याचा प्रतिनिधि', 'ईश्वराचा प्रतिनिधि' आणि 'सर्वश्रेष्ठ इमाम' असे म्हणवून घेतले. दिल्लीच्या सर्व सुलतानांमध्ये फक्त यानेच खलीफाचे सार्वभौमत्त्व मानले नाही, हे आपण त्याच्या नाण्यांच्या अभ्यासावरून सिद्ध करू शकतो. तसेच मुहम्मद तघलकाच्या

नाण्यावरून तो सुरुवातीला खलीफाच्या अधिपत्याच्या विरुद्ध होता आणि नंतर खलीफाने सार्वभौमत्त्व स्वीकारले याबद्दल बरीच माहिती मिळते. त्याच्या नाण्याबद्दलच्या प्रयोगामुळेच व्यापारोद्योगाला जबर धक्का बसला हे सर्वश्रुत आहे.

शेरशाहाच्या काळात टाकसाळींची संख्या वाढली. त्याच्या आधी फक्त ७ टाकसाळी होत्या तर त्याच्या काळात २३ टाकसाळी नाणी पाडत होत्या. ही संख्या मुघलकाळात वाढतच गेली. यावरून लोकांच्या आर्थिक व्यवहाराला अनुकूलता प्राप्त होऊन व्यापारोद्योग हळूहळू वाढत गेला. अकबराच्या इलाही नाण्यावरून त्याच्या धार्मिक विचारांचा अभ्यास करता येतो. त्या नाण्यांच्या अभ्यासामुळे दीन-ए-इलाहीवर महत्त्वाचा प्रकाश पडतो. जहांगीरच्या नाण्यावर नूरजहानचे नाव पण कोरण्यात येऊ लागल्याने जहांगीरच्या राज्यकारभारात

नूरजहानचे स्थान आणि तिचे वर्चस्व स्पष्ट होते. मुघलकाळात नाण्याची घडण, त्याचे वजन, त्यावरील सुंदर अक्षर हे अप्रतिम होते. तसेच नाण्यांचे लहान मोठे बरेच भाग पाडून त्या त्या भागाच्या किंमतीइतकी नाणी पाडण्यात आली. उदा० अर्धा रुपया, एक चतुर्थांश, रुपयाचा चाळिसावा भाग (तांब्याचा दाम), दमडा, दमडी वगैरे विविध किंमतीची बरीच नाणी पाडण्यात आली. यामुळे व्यापारोद्योगाला गति प्राप्त झाली. नाण्यावर राजाचे नाव असल्याने त्याच्या पदाबद्दल बराच तर्क करता येतो. तो सार्वभौम होता किंवा इतर राजाना अंकित होता याबद्दल माहिती मिळते.

दक्षिणेतील हिंदू राजांची सोन्याची नाणी आकाराने व वजनाने लहान होती. या नाण्यावर राजाचे नाव आणि देवदेवतांची चित्रे असल्याने त्यांच्या राज्यविस्ताराबद्दल आणि त्यांच्या धार्मिक श्रद्धा, विश्वास आणि धोरण याबद्दल निश्चित मत मांडता येईल. मुघलकाळात मोहरा दैनंदिन व्यवहारात कचित प्रसंगी वापरत तर विजयनगरच्या वराहांचा किंवा होनांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असे. तसेच विजयनगर वराहाचे बरेच भाग करून त्या भागांच्या किंमतीइतकी लहान लहान नाणी पाडण्यात आली होती. होन, काटि, हण, चक्र, अड्डु, हाग, बेळे, वीस, अरेवीस आणि कासु अशी विविध किंमतींची नाणी प्रचलित होती. यामुळे त्यांचा व्यापार भरभराटीला आला होता. याप्रमाणे नाण्याच्या अभ्यासामुळे राजकीय, आर्थिक आणि प्रशासकीय विषयाबद्दल बरीच ऐतिहासिक माहिती मिळते.

वाङ्मयीन साधने

वाङ्मयीन साधने समकालीन कागदपत्राइतकी विश्वसनीय कधीच नसतात त्यात कल्पनेला तसेच अतिशयोक्तीला बराच वाव असतो. शिवाय वाङ्मयाचा उद्देशच वेगळा असतो. तेव्हा इतिहास लेखनासाठी त्यांचा वापर जपून करावा लागतो. आपण पंजाबमधील वाङ्मयसाधनापासून सुरुवात करू. पंजाबमधील पहिले महत्त्वाचे साधन म्हणजे 'पोथी साहिले' हे होय. हाच ग्रंथ

'ग्रंथ साहिब' म्हणूनही प्रसिद्ध आहे. १६०४ मध्ये अर्जनदेव या पाचव्या गुरूंनी • ग्रंथ साहिब पूर्ण केला. त्यामुळे शीख गुरूंच्या धार्मिक व राजकीय विचारांवर, मध्ययुगीन काळातील लोकांचे धार्मिक विचार आणि आचरण आणि त्या काळामधील आर्थिक परिस्थिती यांच्यावर प्रकाश पडतो. गुरु अर्जनदेव यांचा शिष्य, भाई गुरुदास याचे 'वार' आणि 'कबित' ही सुद्धा महत्त्वपूर्ण साधने आहेत. 'वलायतवली,' 'मेहरबानवली' आणि 'बालावली' यांसारख्या १७व्या शतकात रचलेल्या जनमसाखींमुळे त्या काळातील सामाजिक व आर्थिक इतिहासावर प्रकाश पडतो. भाई मणीसिंग यंच्या 'ग्यान रत्नावली' आणि 'भगत रत्नावली' आणि भाई सुखसिंग यांचा 'गुरविलास' या कृती म्हणजे १८व्या शतकामध्ये लिहिली गेलेली महत्त्वाची साधने होत.

वारिस शाह (१७३०-९०) याने लिहिलेले 'हिर' म्हणजे 'सामाजिक जीवनाच्या भोजन, पोशाख, दागदागिने, समजुती आणि रीतीरिवाज, विश्वास, निषिद्ध मानल्या जाणाऱ्या गोष्टी, वांशिक वैशिष्ट्ये, संन्यासी, मुसलमान, दैवी गोष्टी इत्यादि निरनिराळ्या विषयांबाबतच्या माहितीची खाणच होय.' बुल्हे शाह याच्या कफियानामुळे त्या काळातील सूफी पद्धतींवर प्रकाश पडतो. अनेक रहितनाम्यामुळे (वर्तनाचे नियम) त्या काळातील शीख समाजाबद्दल माहिती मिळते. शीख गुरूंचे लिखाण ऐतिहासिक संशोधनासाठी वापरण्याआधी त्यांचे काळजीपूर्वक मूल्यमापन करणे आवश्यक आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

बंगालच्या मध्ययुगीन इतिहासाबद्दलच्या महत्त्वाच्या वाङ्मयीन साधनांपैकी 'राजमाता', 'चंपक विजय', 'कृष्णमाला', 'महाराष्ट्र पुराण', 'वरदमंगल' आणि 'तीर्थमंगल' यांचा उल्लेख करता येईल. सुरुवातीच्या मुसलमान लेखकांच्या काही साहित्यकृती अंशतः ऐतिहासिक स्वरूपाच्या आहेत. उदा. सईद सुलतान (१६ वे शतक) यांचे 'नबीवंश' आणि 'सबे मेयेराज' आणि जैनुद्दीनचे 'रसूलविजय' या अशा प्रकारच्या साहित्यकृती आहेत.

वृंदावनदास यांचे 'चैतन्य भागवत', ' जयनंदाचे 'चैतन्यमंगल', लोचनदासांचे 'चैतन्यमंगल', कृष्णदास कविराजाचे 'चैतन्यचरितामृत' आणि तत्सम काव्यांमुळे त्या काळातील धार्मिक जीवनावर प्रकाश पडतो. चैतन्यांच्या मृत्यूनंतरच्या वैष्णव साहित्यात चरित साहित्य (चरित्रात्मक साहित्य), निबंध साहित्य (तत्त्वज्ञानात्मक साहित्य) आणि कृष्णमंगल (कृष्ण आख्यायिका) या कृती समाजिक आणि धर्म- तत्त्वज्ञानात्मक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. सहजीय साहित्य हे धार्मिक जीवनाच्या पद्धतींच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहे. नाथ साहित्यसुद्धा अशाच प्रकारे उपयुक्त आहे. कृत्तिवासाचे बंगाली 'रामायण' पंधराव्या शतकातील बंगाली सामाजिक दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करते. त्याचप्रमाणे काशीराम दासांचे बंगाली 'महाभारत', रघुनाथ पंडिताचे 'भागवत पुराण' आणि अलाओलचे 'पद्मावती' यांसारख्या अनुवादित साहित्यांमुळे मध्ययुगीन काळातील सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. काही मुस्लीम लेखकांनी राधा-कृष्ण या विषयावर लिहून लोकांमध्ये एकप्रकारे सांस्कृतिक समन्वय साधायचा प्रयत्न केला. 'पांचाली' या सत्यनारायण, सत्यपीर आणि इतरांच्या विशिष्ट साहित्यप्रकाराने सांस्कृतिक समन्वयामधून नवीनच उदयाला आलेल्या देवतांना कीर्ती प्राप्त करून दिली.

बंगाली साहित्याची दुसरी एक शाखा म्हणजे 'मंगल-काव्य' ही होय. लोकप्रिय देवतांची कीर्ती गाण्यासाठी ही रचली जात असत. त्यामुळे बंगालच्या समाजजीवनावर प्रकाश पडतो. मुकुंदरामाचे 'चंडीमंगल' सोळाव्या शतकातील बंगालच्या सामाजिक इतिहासासाठी अतिशय मौलिक स्वरुपाचे आहे कारण त्याचा संबंध सत्य जीवनाशी आहे. त्याचप्रमाणे रूपराम (इ.स. १६४०), रामदास (१६६६) सीताराम (१६९६) आणि घनराम (१७११) यांचे 'धर्ममंगल' हेही अशाच प्रकारचे आहे. धर्मपुराण या साहित्याच्या प्रकारामुळे बंगालच्या कृषिजीवनाविषयी माहिती मिळते. रामप्रसादाने देवी स्तुतीपर अनेक गाणी रचली. यातील काही गाण्यांमधून बंगालच्या कुटुंबजीवनाविषयी महत्त्वाची माहिती मिळते. विशेषतः १७व्या आणि १८व्या शतकातील स्त्रियांची दुःखद अवस्था यात वर्णन केलेली आढळते.

गुजरातमधील साहित्य कृतीपैकी सुरुवातीच्या मध्ययुगीन काळामध्ये 'कुमारपालचरित' आणि 'देशीनाममाला' या हेमचंद्ररायाच्या प्राकृत रचना 'ढोलका' येथील जनार्दनाने लिहिलेले 'मेघदूत भाष्य', मेरुतुंगाचार्याने अपभ्रंशामध्ये लिहिलेले 'प्रबंधचिंतामणी' या प्रामुख्याने साहित्यकृती होत्या आणि तत्कालीन समाजावर त्या किंचित प्रकाश टाकतात. विजयसेन सूरीचे 'कछूछुली रास', अंबादेव सूरीचे 'समर रास', मंडलिकाचे 'पेथड रास', आणि तत्सम रचनांमधून गुजरातमधील १३व्या आणि १४व्या शतकातील सामाजिक बाबींचा उल्लेख आढळतो. सर्वानंदसूरीच्या 'जगदुचरित्रा'मुळे (१४वे शतक) गुजरातच्या सागरी व्यापारावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो. पंडित लावण्यसमय याने १५१२ मध्ये रचलेल्या 'विमल प्रबंधा' मध्ये वणिक् समाजाच्या निर्मितीबद्दल माहिती मिळते. त्याचप्रमाणे सामाजिक परंपरा, खेड्यातील शालेय शिक्षण, विवाहपद्धती आणि तत्सम इतर गोष्टींबद्दल माहिती मिळते. आमोद येथील गणपती याने १५१८ मध्ये रचलेला 'माधवानल-कंकणदल प्रबंध' हासुद्धा सामाजिक इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहे. नरसी मेहता, मीराबाई आणि इतरांच्या भक्तिरचना या त्या काळातील धार्मिक परिस्थितीबद्दल माहिती देणारी महत्त्वपूर्ण साधने होत. केशवदास वैष्णव (१७वे शतक) याचे 'वल्लभवेल' हे ऐतिहासिक काव्य वल्लभाचार्यांच्या भारतभर केलेल्या

प्रवासावर आधारित आहे. हे काव्य त्यांच्या गुजरातमधील संप्रदायाच्या अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त आहे. १६८० मध्ये एका पारशी कवीने सियावक्ष या इराणी राजपुत्राबद्दल लिहिलेले 'सियावक्षनामे' या काव्यामध्ये गुजरात राज्यातील पारशी समाज हिंदूंच्या वर्चस्वाखाली कशा रीतीने आला या गोष्टीचे दर्शन घडते. अंतिमतः विविध

प्रसंगांवर रचलेले गर्बा त्या काळातील सामाजिक परिस्थितीचे चित्रण करते. राजस्थानमधील वाङ्मयीन साधने बरीच आहेत. मंडनचे 'राजवल्लभ', जयसोम याचे 'कर्मचंद-वंशोत्कीर्तन-काम-कार्यम्' यातून अनुक्रमे मेवाड आणि

बिकानेर येथील नगररचनेवर प्रकाश पडतो. पद्मनाभाची 'कनहड्डे प्रबंध' ही रचना म्हणजे मेवाडची समृद्धि, उत्पादने, तेथील लोकांचे समाजजीवन, रीतीरिवाज, समजुती, दिनचर्या यांबाबतच्या माहितीची खाणच होय. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे या रचना म्हणजे साहित्यकृती आहेत. ऐतिहासिक कागदपत्र अथवा बखरी नव्हेत. त्यांचा वापर काळजीपूर्वक केला गेला पाहिजे. ज्या काळामध्ये ते लेखक जगत होते. त्या काळातील समाजिक व आर्थिक परिस्थितीवर या रचना प्रकाश टाकतात.

अबुल फझलने अकबरनामा लिहिण्याचे काम ज्यावेळी हाती घेतले त्यावेळी राजस्थानमधील सुरुवातीच्या राज्यकर्त्याची माहिती पुरविण्यासाठी अनेक प्रकारच्या रचनांचे संकलन करण्यात आले होते. अशा कृतींमध्ये वंशावळी, ख्यात, वाट, वार्ता, गीत आणि रासो यांचा समावेश असे. या कृती परंपरागत हस्तांतरित झालेल्या माहितीवर, आठवणीवर आणि व्यक्तिगत अनुभवांवर आधारित असत. चारण आणि भाट यांनी त्यांचे प्रामुख्याने संकलन केलेले होते. १७व्या शतकातील नेन्सीच्या ख्यातामध्ये केवळ राजकीय माहितीच नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक माहितीही मिळते. त्याचे 'गनवारीविगत' हे त्या काळातील एक प्रकारचे गॅझेटियरच होते. त्याचप्रमाणे दयालदास आणि बांकीदास यांनी संकलित केलेल्या ख्यातामुळे त्या काळातील लोकांच्या जीवनावर प्रकाश पडतो.

मराठी भाषेत विविध प्रकारच्या साहित्यकृती निर्माण झाल्याः बखरी, कैफियत, चंपूकाव्ये, पोवाडे, लावण्या, महानुभाव साहित्य, संतचरित्रे वगैरे. या साहित्यकृतीमध्ये कमी अधिक प्रमाणात ऐतिहासिक माहिती मिळते. ऐतिहासिक दृष्टीने इतर साहित्यकृतीपेक्षा बखरीना जास्त महत्त्व आहे. राजवाड्यांच्या मते 'शालीवाहनाची बखर' ही सर्वात जुनी बखर होय. सभासद बखर, चित्रगुप्त बखर, शिवदिग्विजय बखर, भाऊसाहेबांची बखर, पानिपतची बखर, पेशव्यांची बखर तसेच भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली वगैरे वाङ्मयकृती महत्त्वाच्या आहेत. रामचंद्रपंत अमात्याचे 'आज्ञापत्र' शिवकालीन शासनव्यवस्थेविषयक उत्तम ग्रंथ आहे. बखरीपेक्षा कमी ऐतिहासिक सत्य असलेल्या कृतीमध्ये निरंजन माधवाचे वाङ्मय, दासो दिगंबराचे 'संतविजय', महीपतीचे 'भक्तविजय' आणि राजारामप्रसादाचे 'श्रीभक्तमंजरीमाला' यांचा समावेश करता येईल.

कानडी भाषेत फारसी तवारिखा किंवा मराठी बखरी या सारिख्या काही वाङ्मयीन कृती लिहिल्या गेल्या. 'रणधीर कंठीरव नरसराजविजयम्', 'चिकदेवराजविजयम्', 'चिकदेवरायाबिन्नपम्', 'केळदिनृपविजयम्', 'अप्रतिमवीर चरितम्', 'मडकेरी राजेंद्र दंडक' अशा वाङ्मयीन ग्रंथात बरीच ऐतिहासिक माहिती सापडते. कमी ऐतिहासिक सत्य असलेल्या कृतीमध्ये 'राजावली कथे', 'कदंबपुराण', 'बिज्जळरायपुराण', 'मुल्लाशास्त्र', 'नंजराज यशोभूषण', वगैरे ग्रंथांचा उल्लेख करता येईल.

मध्ययुगीन आंध्रप्रदेशात साहित्यक्षेत्रातील पहिली महत्त्वाची व्यक्ति म्हणजे पालकुर्की सोमनाथ होय. याने २५ ग्रंथ लिहिल्याचे सांगितले जाते. 'अनुभवसारम्', 'बसवपुराण,' आणि 'पंडिताराध्यचरित्र' यासारख्या त्याच्या ग्रंथामुळे वीरशैव पंथाचे स्वरूप आणि प्रसार यांवर आणि तामीळ प्रदेशातील ६३ नायनार यावर प्रकाश पडतो त्याचप्रमाणे याचे 'मार्कंडेयपुराण', एर प्राग्गुडाचे 'हरिवंशम्', नाचन सोमनाथाचे 'उत्तरहरिवंशमु', मडिकी सिंगणाचे 'द्विपाद भागवतम्', श्रीनाथाचे 'काशीखण्डम्' आणि 'हरविलासम्' अल्लसानी पेद्दणाचे 'मनुचरित्र' (पहिला प्रबंध), अय्यलराजू रामभद्राचे 'रामाभ्युदयम्' या काही ग्रंथांमधून लोकजीवनावर प्रकाश पडतो. तेन्नावी रामलिंगाच्या पांडुरंगमहात्म्य' मध्ये ग्रामीण जीवनाबद्दल, लोकांचे रीतीरिवाज व समजुती याबद्दल, त्यांच्या पोशाखासंबंधी, त्यांच्या छंदाविषयी व इतर सामाजिक बाबींबद्दल वर्णन आढळते. कासे सर्वप्पाचे 'काकतीयराजवंशावळी', अंदुगुल वेंकटय्याचे 'रामराजीयमु', कुमार धूर्जटीचे 'कृष्णरायविजयमु', विजयराघवाचे 'रघुनाथाभ्युदयम् या अधिक ऐतिहासिक स्वरूपाच्या साहित्यकृती होत्या. 'रायवाचकमु' आणि एकाम्रनाथाचे 'प्रतापचरित्र' यासारख्या गद्यकृती आणि कैफियती यासुद्धा आपल्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

तामीळमध्ये अनेक अर्ध ऐतिहासिक सहित्यकृती लिहिल्या गेल्या. यापैकी महत्त्वाच्या म्हणजे 'उला', 'कोवाई', 'परनी', 'कलाम्बकम्', अम्मनाई, 'शतकम्' आणि 'पिल्लाइत्तमिळ' या होत. 'उला' हे एका राजाबद्दल किंवा एकन देवतेबद्दल स्तुतीवाचक असे काव्य आहे. 'कोवाईमध्ये' प्रेमकाव्य, नायकस्वरूपातील राजाची कामगिरी आणि तत्सम

इतर काव्य यांचा संग्रह आहे. 'परनी' हे एक युद्धकाव्य आहे. 'कलाम्बकम्' मध्येसुद्धा राजाच्या कामगिरीबद्दल लिहिलेले आहे. पण ते एक विषयापुरतेच मर्यादित असते. 'अम्मनाई' हा एक ऐतिहासिक पोवाडा आहे. 'रामप्पय्यन अम्मनाई' याचा विषय म्हणजे मदुराईच्या तिरुमल नायकाचे (१६२३-५१) सेनापती रामप्पय्यन याने केलेले लष्करी शोषण हा आहे. 'शतकम्' सतराव्या आणि अठराव्या शतकामध्ये लोकप्रिय झाले आणि त्यामुळे विशिष्ट भागाच्याच परिस्थितीवर प्रकाश पडतो. 'पिल्लाई' मध्ये नायकाच्या बालपणातील चरित्रचित्रण आहे. आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे आनंदरंगम् पिल्ले यांची दैनंदिनी हे होय. यामध्ये १७३६-१७६० या काळाचे वर्णन आहे. यात दक्षिण भारतातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे वर्णन आढळतेः